# निष्काम लोकसेवेचे अग्रदूत - संत गाडगेबाबा

प्रा. डॉ. प्रल्हाद भोपे
मराठी विभागप्रमुख, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

मानवतावादी दृष्टिकोनातून मार्गक्रमण करीत विज्ञानवादी प्रगतिशील विचारांच्या आधारे शोषितांच्या दु:खितांच्या तसेच तळागाळातील दिनदुबळ्या समूहाच्या वेदनेवर फुंकर घालणारा महाराष्ट्रातील आधुनिक काळातील थोर समाजसेवक आणि कर्मयोगी संत म्हणजे गाडगेबाबा होत.

भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या नागड्यांना वस्त्र, गरीब मुला-मुलींना शिक्षण, बेघरांना आसरा, अंधुक पंगु रोग्यांना औषधोपचार, बेकारांना रोजगार, पशुपक्षी मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणीचे लग्न, दु:खी व निराशांना हिम्मत या दससूत्रीप्रमाणे आपल्या कार्याला विधायक गती देऊन संपूर्ण आयुष्यभर लोकसेवेचा कर्म यज्ञ गाडगेबाबांनी धगधगता ठेवला होता. संतांच्या साहित्य या कार्याची प्रासंगिकता या एक दिवसीय आंतर विद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने त्यांच्या कार्यावर या शोध निबंधाच्या निमित्ताने घेतलेले वेध.

गाडगेबाबांना अक्षर ओळख नसली तरी ते बुद्धी प्रामाण्यवादी होते. खराटा आणि कीर्तन या दोन प्रभावी साधनांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामस्वच्छता आणि वैचारिक प्रबोधनाचे अलौकिक कार्य सहजरित्या पार पाडले. गाडगेबाबांच्या व्यक्तीत्वाला अनेक पैलू आहेत. ते संत, थोर समाजसेवक, कीर्तनकार, लोकशिक्षक, गायक, वक्ता, प्रशासक, संघटक, व्यवस्थापक, निष्ठावंत शेतकरी, वास्तु विशारद, शेतीतज्ञ तत्त्वज्ञ होते. त्यांच्या अंगी प्रचंड आत्मविश्वास होता. परिणामी ध्येय निश्चिती झाल्यानंतर घरादारावर तुळशीपत्र ठेवून विश्वकल्याणाच्या दिशेने त्यांनी मार्गक्रमण केले. वैयक्तिक भौतिक सुखांना तिलांजली देऊन सुखाचा नवा मार्ग त्यांनी शोधला. बुद्धाच्या अनुभूतीचा पुनर्प्रत्यय त्यांनी घेतला 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' ही तत्व मानून जनहितार्थ लोकोधारक आणि लोकजागृतीचे कार्य अखंडपणे केले. "बाबांचा आठ दशकांचा जीवन प्रवास म्हणजे अंगार रेषा आहे ना ते कोणाचे शिष्य ना कुणाचे चेले राहिले. ते माणूसपारखी होते. त्यांना फसू पाहणाऱ्यांना त्यांच्या व्यावहारिक दृष्टीचे चटके बसले. कानात बांधलेले एका फुटक्या कवडीशिवाय ना त्यांनी कोणती माया जोडली ना कुठे विसाव्याला छाया शोधली? उलट समाजातील लाखो लोकांना त्यांनी मायेचा हात दिला. तळागाळातील अंधश्रद्धेने आणि गरिबीने ग्रासलेल्या समूहाला जगण्याचं तत्त्वज्ञान दिले. अक्षर ओळख नसतानाही शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. लोकोपयोगी वास्तू निर्माण केल्या. एकंदर गाडगेबाबांनी लोकसहभगातून लोक परिवर्तनाचे केलेले काम पाहता निष्काम लोकसेवेचा अग्रदूत या शब्दात्च बाबांचा गौरव करणे सार्थ होईल. प्रथम सत्यशोधन नंतर समाज सुधारणा शेवटी समाज परिवर्तन याप्रमाणे समाज व्यवस्थेत बदल घडून आणणारा विलक्षण जिद्दीचा आणि विलक्षण बुद्धीचा महापुरुष म्हणजे कर्मयोगी गाडगेबाबा होत. सेवा धर्माकडून मानव धर्माकडे जाणारा मार्ग बाबा प्रशस्त करीत होते. लोकसेवेच्या या अभियानास रचनात्मक सौंदर्य प्राप्त झाले होते. गाडगेबाबांनी संपूर्ण सेवामय जीवन प्रवासामध्ये धर्म, देव, अंधश्रद्धा, व्यसन, अस्पृश्यता व शिक्षण इत्यादी महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर व्यावहारिक

दृष्टिकोनातून काटकसर उद्योगशीलता, स्वच्छता इत्यादी गोष्टीचे महत्त्व प्रतिपादिले. तसेच लोकोपयोगी वास्तू, नदीवरील घाट, आश्रम शाळा, धर्मशाळा व वसतिगृहे गोरक्षण इत्यादीची निर्मिती त्यांनी लोक सहभागातून केली. निस्वार्थ भावनेतून केवळ जनहितार्थ केलेल्या या कार्याला नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले आणि गाडगेबाबांनी स्वतःला आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत या कार्यासाठी वाहून घेतले.

**गाडगेबाबांची देव विषयक कल्पना**

त्यांच्या अखेरच्या कीर्तनामधून त्यांची देवविषयक कल्पना स्पष्ट होते त्या कीर्तनामध्ये ते संत तुकोबारायाचा अभंगाचा पुरावा देऊन म्हणतात,

देव पहावयाशी गेलो अन् तेथे देव होऊनी ठेलो

जो देवाच्या शोधात निघतो तो स्वतःच देव होतो. देव ही दिसण्याची गोष्ट नाही. पृथ्वीच्या निर्मितीपासून आजपर्यंत देव कुणीही बघितला नाही, परंतु परमेश्वराचे भजन केल्याने मनुष्य देव होतो. अर्थात देवाच्या अस्तित्वाविषयी आपल्या कीर्तनातून विवेचन करताना त्यांची भूमिका अगदी स्पष्ट आहे. ज्ञानेश्वरी मधील उदाहरण देऊन ते पटवून देतात,

वायु वसे सकळ ठाई
परी त्याचे बिऱ्हाडची नाही

देवाचे अस्तित्व हे वाऱ्याप्रमाणे न दिसणारे आहे. देव देवळात नसतो, तीर्थात नसतो, यात्रेत नसतो, दगडात नसतो. हा सर्व देवाच्या नावावर चाललेला बाजार आहे. देवाची प्रार्थना केल्याने भजन केल्याने अंगी देव पण येते. म्हणजे नम्रता, लिनता या गोष्टी माणसाला देवत्वाकडे पोहोचवितात. संत तुकारामाच्या अभंगाचा पुरावा देऊन गाडगेबाबा म्हणतात,

ज्याचा अभिमान गेला
तुका म्हणे देव झाला

माणसांनी आपल्या अंगीचा अभिमान त्यागला की, माणूस देव होतो असे गाडगेबाबा सांगत. महात्मा गांधीजींचे उदाहरण देऊन ते सुचवितात देशावरील संकट निवारण्यासंदर्भात गांधीजींनी जे कार्य केले त्यावरून ते देव ठरतात. अर्थात जो माणूस जगाची सेवा करेल, गरिबावर दया करेल, परोपकार करेल तो देवपदास पोहोचेल. देव हा माणसांमध्येच आहे. माणसाची सेवा करा. तीच देवाची भक्ती आहे असे त्यांना वाटते. मंदिरातला देव त्यांनी नाकारला. माणसात देव बघितला. दया, परोपकार, दिन दुबळ्याची सेवा ही सर्व देवाची भक्ती आहे आणि म्हणून माणसांमध्ये देव सामावला आहे. त्यांची किर्तन शैली नाविन्यपूर्ण होती. माणसाची सेवा करा अशी भूमिका त्यांची आहे.

**गाडगेबाबांचे शिक्षणविषयक विचार**

संत गाडगेबाबा स्वतः निरक्षर असले तरीही शिक्षणाविषयी त्यांना अत्यंत तळमळ होती. शिक्षण नसल्यामुळे माणसाचे काय हाल होतात हे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले होते. समाजसेवेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या बाबांना समाजाच्या अध्ययनातून शिक्षणाचे मर्म गवसले होते. त्यांचे आखेरचे कीर्तन व त्यांचा पत्रव्यवहार यामधून त्यांची शिक्षणविषयक भूमिका स्पष्ट होते. त्यांचे समाज

निरीक्षण विलक्षण होते. बहुजन समाजाच्या गरिबीचे खरे कारण त्यांच्या ठाई असलेली अविद्या आहे. ज्याला विद्या नाही त्याला 'खटाऱ्याचा बैल' म्हटले तरी चालेल असे त्यांना वाटते. पैसे नाही म्हणाल तर जेवणाचं ताट मोडा. हातावर भाकरी खा, बायकोले लुगडं कमी भावाचं घ्या, इवाहयाला पाहुणचार करू नका, पण मुलाले शाळेत घातल्याविना सोडू नका. शिक्षणाशिवाय माणसाची प्रगती नाही म्हणूनच दूरदृष्टीकोणातून शिक्षणविषयीचे महत्त्व ते सांगतात त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उदाहरण देतात, बाबासाहेबांच्या वडिलांना सुबुद्धी सुचली नसती आणि त्यांनी जर बाबासाहेबांना शाळेत पाठविले नसते तर त्यांच्याही नशिबी पिढीजात झाडू मारणे आले असते. म्हणून शिक्षण ही फार मोठी गोष्ट आहे आणि इथे शिक्षणाचा संबंध सरळ परमात्म्याच्या भक्तीशी त्यांनी जोडला आहे.

**गाडगेबाबांची अस्पृश्यताविषयक भूमिका**

अस्पृश्यता, जाती-जातीमधील भेदभाव हा भारताला लागलेला मोठा डाग आहे, कलंक आहे असे त्यांना वाटते. जगातील अनेक देशाची उदाहरणे देऊन ते म्हणतात, हिंदुस्तानाले डाग आहे शिवाशिवीचा डाग आहे. विलायतेमध्ये शिवाशिवी रशियाच्या राज्यात नाही, अमेरिकेत नाही, फारशी लोकात नाही, ख्रिश्चन लोकात नाही, म्हटलं होतं हजरत न कधी की विटाळ झाला, पाणी विटाळले म्हणजे जगामध्ये इतरत्र अस्पृश्यता नाही मग ती भारतातच का असा प्रश्न त्यांना पडतो. अस्पृश्यतेसंबंधी विचार करताना जगामध्ये दोनच जाती ते मान्य करतात एक पुरुषाची व दुसरी स्त्रीची अस्पृश्य वर्गाला ते हरिजन या नावाने संबोधतात. माणसांनी आपल्या सोयीप्रमाणे शास्त्र तयार करून आपल्या सोयीप्रमाणे स्वार्थासाठी त्याचा वापर केला. माणसाला माणूसपण येण्यासाठी अस्पृश्यता निकालात काढणे गरजेचे आहे असे त्यांना वाटते. शिवाशिवि काढा, सरळ शहाणे व्हा आणि माणूसपणा पैदा करा! कीर्तनामधून त्यांनी माणसांमध्ये माणूसपणा निर्माण होण्यासाठी स्पृशास्पृश्यभेदभाव नाहीसा होणे गरजेचे आहे हे ते संगतात. गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनामधून लोकांना व्यवहारिक नीती शिकवली. काटकसर किती गरजेची आहे ते शेवटच्या कीर्तनामधून सांगितले. समाजामध्ये मारवाडी, गुजराती, ब्राह्मण मजेत कसे व बहुजन व अस्पृश्य अडचणीत कसे ही गोष्ट उदाहरणासह गाडगेबाबा स्पष्ट करतात त्यांच्याजवळ जमाखर्च आहे. किती रुपये कमाई आणि खर्च याचा हिशोब आहे. म्हणून ते मजेत आहेत. उलट इतर तेली, माळी, कुणबी, नावी धोबी, महार इत्यादी जवळ जमाखर्चाचा ताळमेळ नाही म्हणून उत्पन्नापेक्षा खर्च अधिक होतो व ते अडचणीत येतात. म्हणून ते म्हणतात, काटकसर पाहिजे, घरी जमा खर्च पाहिजे. लई जण म्हणतात पगार पुरत नाही. पगार पुरत नाही. पगार सरतच नाही असं म्हटलं पाहिजे. ज्या घरात नवरा बायको बुद्धिमान, अक्कलवान असतील तिथे पगार सरत नाही. शिल्लक पेटीत पाहिजे. थोडक्यात, काटकसर जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाची असून उत्पन्नाचा अंदाज घेऊन खर्च निर्धारित केला तर जीवन सुखमय होईल असा संदेश ते सर्व सामान्य जनतेला देतात.

व्यसनाधीनता ही भारतीय समाजाला लागलेला एक कलंक आहे आणि म्हणून दारूच्या व्यसनाच्या आहारी गेलेल्या समूहाला ते उपदेश करतात, ज्या दारुने करोडपतीचा खानाखराबा केला. राजपुत्र मारले, राजवाडे ओस पाडले, त्या दारूच्या सावलीतही उभे राहू नका. हातभट्ट्या काढून दारू पिता. तरुण मुलांनो ज्याचा बाप दारू पीत असेल, तो बाप दारू पिऊन सापडला त्याचं बापाचं नातं

वाळ ठेवून द्या. तो बाप नाही वैरी आहे. त्याच्या अंगावर, त्यांची शेंडी आणि काळा पायातला बूट म्हणजे व्यसनाधीन झालेल्या बापाला धडा शिकविण्याचे काम मुलाने करावे. व्यसनाचे दुष्परिणाम अत्यंत विदारक असून सामाजिक पत, स्वास्थ्य या सर्व गोष्टीची हानीच त्यामध्ये अपेक्षित आहे; त्यामुळे सुखी आणि आनंदीं जीवनासाठी दारूचा त्याग करणे गरजेचे आहे असे ते पोटतिडकेने समाजाला कीर्तनातून सांगतात. गाडगेबाबांच्या विवेचनानुसार ज्या मुक्या प्राण्याला आपण आपल्या पोटच्या पोराप्रमाणे सांभाळतो; त्याच्यावर प्रेम करतो आणि स्वतःच्या स्वार्थासाठी किंवा जिभेची चोचले पुरविण्यासाठी त्याचा बळी घेतो. ही मानवता नव्हे, प्राणीमात्रांवर, गोरगरिबांवर दया केली पाहिजे अशी शिकवण ते कीर्तनातून देतात.

संत गाडगेबाबा हे अतिशय शिस्तप्रिय व्यक्ती होते. त्यांच्या पत्र व्यवहारांमधून अनेक ठिकाणी त्याचा प्रत्यय येतो. कामातील नीटनेटकेपणा, स्वच्छता, शिस्त त्यांना आवडत असे. गाडगेबाबा त्यांच्या समाज उपयोगी कार्यामध्ये मदत करणाऱ्या माणसाविषयी अत्यंत कृतज्ञता बाळगायचे. मग ती मदत कुठलीही असो त्याची माहिती सर्वांना व्हावी याचा आग्रह ते धरीत. परंपरागत गुरु-शिष्य परंपरेला स्पष्ट शब्दांमधून नकार दिलेला आहे. बुद्धीप्रमाणे गाडगेबाबा गुरु आणि शिष्य या संबोधनाला आपल्या विचारात कुठेही स्थान देत नाहीत.

संत गाडगेबाबांच्या आचार विचारांची दिशा त्यांच्या जीवनदृष्टीतून स्पष्ट होते. पुरोगामी विचारसरणी बुद्धीप्रमाणे विज्ञानवादी दृष्टिकोन त्यांच्या विचारांमध्ये ठासून भरलेला दिसतो. त्याचबरोबर त्यांना प्रत्येक कामामध्ये, गोष्टींमध्ये नेमकेपणा आणि नेटकेपणा आवडतो. स्वच्छता हा त्यांच्या जगण्यातील स्थायीभाव आहे. प्रत्येक काम हे विलोभनीय, आकर्षक असले पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. त्यांच्या स्वभावामधले कमालीची विरक्ती सामावली आहे. एकदा घर सोडल्यानंतर कोठेही त्यांनी सगेसोयरे, नातेवाईकांना जवळ केले नाही. ते अत्यंत दूरदृष्टीकोनातून विचार करणारे होते त्यांनी केलेल्या कार्यातून दिसून येते की, आयुष्यभर अगदी शेवटच्या घटकेपर्यंत गाडगेबाबांनी स्वतःला जनहितार्थ वाहून घेतले वैचारिकदृष्ट्या संत कबीर, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वरादी संतांचा प्रभाव त्यांच्या विचारावर जाणवतो. त्यांची पदे अभंग आपल्या कीर्तनातून ते वापरतात. त्याचबरोबर देवाविषयी कल्पना, शिक्षण, अस्पृश्यता या संदर्भात महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारसरणीच्या बरेच जवळ गेल्याचे दिसते. महात्मा गांधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी असणारा आदर कीर्तनातून प्रत्ययास येतो. समाज प्रबोधनाचा उत्कर्ष त्यांनी आपल्या कार्यातून साधल्याचे दिसते. गाडगेबाबांचा संदेश म्हणून सांगण्यात येणारी दशसूत्री भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यांना पाणी, उघड्या-नागड्यांना वस्त्र, गरीब मुला-मुलींना शिक्षणासाठी मदत, बेघरांना आसरा, अंध-पंगु रोगी यांना औषोधपचार, बेकारांना रोजगार पशुपक्षी मुक्या प्राण्यांना अभय, गरीब तरुण-तरुणीचे लग्न, दुःखी व निराशांना हिम्मत दससूत्री मधील या सर्व गोष्टी गाडगेबाबांनी आचरणात आणल्या. आजच्या युवकांनी या दससुत्रीचा अवलंब आपल्या जीवनात केला तर खऱ्या अर्थाने कर्मयोगी संत गाडगेबाबांची जयंती साजरी केल्याचे समाधान प्राप्त होईल.